पुण्य नगरी

# बजाज फाउंडेशनच्या वतीने सेंद्रिय शेती कार्यशाळा



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**वर्धा** : बजाज फाउंडेशन, बजाज समूहाच्या सामाजिक दायित्वांतर्गत वर्धा येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले होते. देशी बियाणांच्या वाणांना प्रोत्साहन देणे आणि बियांची निवड, उपचार याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यशाळा आयोजित केली होती. जिल्ह्यात बियाणे पुरेशा प्रमाणात आणण्यासाठी मेळाव्यातून शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास प्रोत्साहित केले.

कार्यशाळेचे उद्‌घाटन फाउंडेशनचे विश्वस्त अपूर्व बजाज यांनी केले. नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रवीण मुळे, प्रकल्प संचालक विद्या मानकर, हरिभाई मोरी आदी उपस्थित होते. यावेळी १०० हून अधिक शेतकऱ्यांनी देशी बियाणे, नैसर्गिक शेती पद्धतींद्वारे लागवड, विविध प्रकारच्या पिकांबद्दल माहिती जाणून घेतली. या मेळाव्यात विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची हजेरी होती. त्यांना उपस्थितांनी मार्गदर्शन केले. यशस्वीतेकरिता अनेकांनी सहकार्य केले.